■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३११ ■ मंगळवार दि.२९ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 311 ■ Tuesday Dt. 29 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# शिरूर तालुक्यातील आर्वीत बोगस मावेजा प्रकरण शासनाची लाखोंची फसवणूक प्रकरणी

## जिल्हा प्रशासन बघ्याची भूमिका का घेत आहे, हा निष्क्रियपणा की पाठराखण?

**अव्हाड क्र. ६१५ मध्ये बोगस मावेजा प्रकरणात मुख्य आरोपी अशोक भोकरे, भूसंपादन विभागाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर?**

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**फक्त साडेसात गुंठे क्षेत्र, पण मावेजा उचलला तब्बल ८० गुंठ्यांचा; मावेजा यंत्रणेमधील अनियमिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण?**

# अशोक भोकरेंनी बोगस मावेजा प्रकरणात हात काळे करून मच्छिंद्र रामभाऊ नावाने उचलले तब्बल १२ लाख १७ हजार रुपये?

## गावात नोंद नसलेल्या व्यक्तीच्या नावावर बोगस मावेजा; अशोक भोकरेंनी मावेजा मिळवण्यासाठी बोगस दाखवला दहा गुंठ्यांचा पेरा!

## भूसंपादन विभाग याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करेल का, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार?



**बीड । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील आर्वी गावात दुसऱ्यांदा बोगस मावेजा उचलण्याचा प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला असून, यामध्ये शासनाची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात बनावट नावे, व चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे मावेजा उचलला असल्याची प्राथमिक माहिती आहे. या अगोदरही अशाच प्रकारचा प्रकार घडला होता. मात्र, त्यातून कोणताही धडा न घेता पुन्हा एकदा शासकीय यंत्रणेला गृहीत धरत फसवणूक करण्यात आल्याचे समजते. अनधिकृतपणे मावेजा उचलून काही दलाल व संबंधित अधिकाऱ्यांनी आपली खिशे भरल्याचा संशय व्यक्त होत आहे.**



अशोक भोकरे नामक व्यक्तीने मावेजा मिळवण्यासाठी अफेअर तफेर करून खोटा पेरा दाखविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वास्तविक दहा गुंठे क्षेत्रात त्याने बनावट माहिती व दस्तऐवजाद्वारे दहा गुंठ्यांवर शासनाकडून मावेजा मिळवला आहे. या प्रकारामुळे शासनाची आर्थिक फसवणूक झाली असून, ग्रामस्थांमध्ये याविरोधात संतापाची लाट उसळली आहे. अशोक भोकरे यांनी पुन्हा बोगस मावेजा प्रकरणात हात काळे केल्याचे समोर आले आहे. यावेळी त्यांनी मच्छिंद्र रामभाऊ या व्यक्तीच्या नावाचा वापर करून तब्बल १२ लाख १७ हजार रुपयांचा बनावट मावेजा उचलल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर फसवणुकीची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

मच्छिंद्र रामभाऊ नावाच्या व्यक्तीचे नाव गावातील सातबाऱ्यावर नाही, तसेच तो गावात राहणारा नसतानाही त्याच्या नावावर १२ लाख १७ हजार रुपयांचा बोगस मावेजा उचलण्यात आला आहे. हा प्रकार अशोक भोकरे यांच्या संगनमताने करण्यात आला असून, शासनाच्या निधीची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधित व्यक्तीने प्रत्यक्षात पाच एकर शेतजमिनीत केवळ साडेसात गुंठेच धरता बनावट कागदपत्रे सादर करून ८० गुंठ्यांचा मावेजा शासनाकडून उचलल्याचे उघड झाले आहे. मावेजा यंत्रणेमधील अनियमिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अव्हाड क्रमांक ६१५ मध्ये अशोक भोकरे यांनी प्रत्यक्षात केवळ दहा गुंठे बोगस पेरले असतानाही, भूसंपादन विभागाने साडेसात गुंठ्यांचा चुकीचा अव्हाड तयार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे शासनाची फसवणूक झाली असून, भूसंपादन विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एवढ्या स्पष्ट चुका समोर असतानाही प्रशासन याकडे दुर्लक्ष करणार का, असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. भूसंपादन विभाग याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करेल का, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.



## शाळेमध्ये घुसून गुंडगिरी करणारे अटक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहर पोलिसांची कामगिरी**

सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या आवारात शाळेतील दोन मुलांच्या एकमेकांमधील किरकोळ भांडणाचे कारणामुळे पाथरूड गल्लीतील काही मुलांनी शाळेमध्ये घुसून मुलास आणि मुलाच्या पालकाला मारहाण केली होती. बीड शहर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून १५ आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून घेतला होता. सीसीटीव्ही फुटेज वरून सर्व आरोपी निष्पन्न झाले आहे. या १५ आरोपी पैकी आठ प्रमुख आरोपी यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. गुन्हा दाखल केल्या पासून काही आरोपी फरार होते. त्यातील चार आरोपी हे अल्पवयीन असल्याने त्यांना पालकांच्या ताब्यात दिली आहे.

अटक झालेल्या आरोपींची नावे खालील प्रमाणे आहेत. अनेश नरेश गायकवाड वय २५ वर्ष, साहिल नरेशद गायकवाड व २१ वर्ष, शेखर रत्नाकर जाधव वय ३१ वर्ष, आकाश पालकर जाधव वय ३९ वर्ष, सर्व राहणार पात्रुड गल्ली अशी आहेत. यातील दोघेजण हे अभिलेखावरील गुन्हेगार आहे आणि त्यांच्यावर अगोदरच मारहाणीची गुन्हे दाखल आहेत. अशा गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी सांगितले आहे.

अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी आरोपी अटकेबाबत सविस्तर सूचना दिल्या होत्या. सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोउपनि महेश जाधव, पो.ह. संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, बापू गायकवाड यांनी केली आहे.

## आजऱ्यातही बनावट सोने तारण ठेवून कर्ज लाटणाऱ्यांची वक्रदृष्टी

### पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत साहेब लक्ष घालाच!

**गेवराई । प्रतिनिधी**

बनावट सोने तारण ठेवून कर्ज लाटणाऱ्यांची वक्रदृष्टी आजऱ्यावर पडली आहे. सोने तारण कर्जाच्या प्रक्रियेत गोल्ड व्हॅल्युवर भुमिका महत्वाची असते. मात्र केवळ नजरअंदाज घेऊन दागिन्यांचे मुल्यांकन (व्हॅल्युएशन) ठरवण्यापर्यंतच त्यांना अधिकार आहेत. दागिन्यांच्या घाकामाचे अथवा दागिन्यातील तुकडा काढून गाळण्याचा अधिकार नसल्याने याचा फायदा फसवणूक करणारी टोळी घेत आहे. गेवराई शहरातील श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी या खाजगी पतसंस्थेच्या लॉकरमध्ये बॅगा अशाच प्रकारे बनावट सोने तारण ठेवून अनेक ठेवीदारांची व खातेदारांची दिशाभूल करत चेअरमन केशव शेषनारायण पंडित व प्रशांत सुभाष शेलार यांनी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. या प्रकरामुळे खाजगी बँका, पतसंस्थांसह बनावट सोने करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.

खाजगी बँका, पतसंस्था, सोने तारण देण्यापुर्वी नेमलेल्या गोल्ड व्हॅल्युवरकडून सोन्याची शुध्दता तपासून घेतात. मात्र अलिकडच्या काळात फसवणूक करणाऱ्या टोळींकडून नामीशक्कल लढवल्याचे दिसून येते. दागिन्यातील केवळ फासा सोन्यांचा ठेवून त्यावर हॉलमार्कचा शिक्का मारल्याचे दिसते. उर्वरित दागिने केवळ सोन्यांचा मुलामा लावून बनावटगिरी केली जात आहे. यामध्ये केवळ नजर अंदाज बांधून सराफ सोन्याची शुध्दता किती हे अंदाजे बँका, पतसंस्थांना कळवतात







व त्यावर संस्था कर्जदाराला सोन्याच्या सुमारे ७० ते ८० टक्के कर्ज देवून १० ते १४ टक्क्यापर्यंत आकारणी करतात. त्यातच तारण सोन्यावर हॉलमार्कचा शिक्का असल्यामुळे सोने शुध्द असल्याबाबत प्राथमिक मत तयार होते. सोने कट केले अथवा सोने गाळले तरच त्याच्या शुध्दतेची नेमकी स्थिती लक्षात येते, पण हेच करण्याचा अधिकार इतरांना नसतो. त्यामुळे बनावटगिरी करणाऱ्यांचे फावत आहे. सराफांबरोबर बँकाही कारण नसताना अडचणीत येत आहेत. आजऱ्यातही सध्या असेच प्रकार सुरु आहेत. यापुर्वीही असे प्रकार घडले असून, जवळपास लाखों रूपयांपर्यंत बनावट टोळीने गंडा घातल्याचा बोलबाला आहे.

नजर अंदाज बांधून सोन्याची शुध्दता ठरवावी लागते. फसवणूक करणारे दागिन्यांचा फासा सोन्याचा ठेवून डिझाईनच्या सोन्याला केवळ सोन्याचा मुलामा दिला जातो. त्यामुळे नेमकी शुध्दता लक्षात येत नाही. फसवणुकीचे प्रकार वारंवार घडत आहेत व्हॅल्युएशनचे काम करावे की नको असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा या बनावट सोने तारण ठेवणाऱ्या चेअरमन केशव शेषनारायण पंडित व गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत सुभाष शेलार यांच्या टोळ्यांमुळे अनेकजण अडचणीत येत असून, बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने एलसीबी च्या माध्यमातून सखोल चौकशी करून आरोपींचे कातडे सोलवायला पाहिजेत याबाबत तातडीने अशा टोळींचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.



## उर्दू, मराठी शाळांजवळच नगर परिषदेचा कचरा डेपो

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील गुरुवार पेठ गवळीपुरा भागातील जिल्हा परिषदेच्या मराठी व पीएम श्री उर्दू शाळांजवळ नगर परिषदेकडून कचऱ्याचे डंपिंग करण्यात येत असून त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक नागरिक यांच्या आरोग्यावर गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नेते डॉ. नरेंद्र काळे आणि ॲड. इस्माईल गवळी यांनी नगर परिषदेला निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

सदर शाळांमध्ये एकूण १६२ विद्यार्थी शिक्षण घेत असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणासमोरच कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत. या भागात ध्वजारोहणाचे कार्यक्रमही घेतले जातात. मात्र या शाळांच्या परिसरातच कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ मरण पावलेले जनावर आढळल्यामुळे संतापाची लाट उसळली आहे. शाळा प्रशासनाने यापूर्वी अनेक वेळा नगर परिषदेकडे तक्रार करूनही काहीही ठोस कारवाई झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. या परिसरात उघड्यावर पडलेला कचरा व दुर्गंधीमुळे विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन शाळेच्या भिंतीलगतचा सर्व कचरा हटवावा, परिसराची स्वच्छता करावी आणि या ठिकाणी पुन्हा कधीही डंपिंग करण्यात येणार नाही, याची नगर परिषदेकडून खात्री देण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसने दिला आहे. स्थानिक पालक, शिक्षक, वसाहतीतील नागरिकांमध्येही याविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून, शाळेच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ व आरोग्यदृष्ट्या सुरक्षित ठेवण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. नगर परिषद प्रशासन या प्रश्नाकडे गांभीर्याने कधी पाहणार, हा खरा प्रश्न सध्या उभा राहिला आहे.

# धारूर येथेल देवस्थान इनामी जमीन प्रकरणाला जबाबदार कोण?

## वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी लक्ष द्यावे : सय्यद सलीम बापू

बीड । प्रतिनिधी

जिल्हाभरात देवस्थानी इनामी जमिनीची अवैध खरेदी विक्री करणारी भू माफिया टोळी सक्रिय असून या टोळी कडून महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अवैध प्रकारे फेरफार करून जमीन लाटण्याचे प्रकार समोर आले असून असेच काही प्रकार धारूर येथेही घडले आहे.

धारूर येथे मंदिर, मस्जिद, दर्गाह, ईदगाह, अशुरूखाना, कबरीस्तान इत्यादी देवस्थानची मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी इनामी जमीन असून या जमिनीवर स्थानिक नेते आणि भू माफिया यांचा डोळा असून या वक्फ मंडळांतर्गत येणाऱ्या देवस्थान मालकी इनामी जमिनी वर स्थानिक नेते आणि भूमाफिया यांनी धारूर येथील तहसीलदार, मंडळाधिकारी, तलाठी व इतर महसूल कर्मचारी आणि धारूर नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगणमत करून अवैध प्रकारे फेरफार व एन ए. लेआउट करून जमिनी लाटण्याचे प्रकार समोर आले आहे.



या प्रकरणावर आंबेडकरी विचार मोर्चा आणि तहरीक-ए-इनाम संघटनेच्या वतीने वेळोवेळी रिष्ठ अधिकार्यांना निवेदने देण्यात आली होती. या सर्व प्रकरणावर एक चौकशी समितीही गठित करण्यात आली होती या चौकशी समितीने काय चौकशी केली ? याचे उत्तर अध्याप आम्हाला मिळालेले नाही. पण धारूर येथील देवस्थान इनामी जमीन प्रकरण उघडकीस आणणाऱ्यांवर काही महिलांना हाताशी धरून खोटे फिर्यादी दाखल करण्याचे प्रयत्न स्थानिक नेते आणि भूमाफिया करीत आहे. या सर्व प्रकरणावर पोलीस अधीक्षक साहेब आणि धारूर येथील पोलीस निरीक्षण साहेबांनीही विशेष लक्ष देण्याचे गरजेचे आहे.

धारूर येथील तहसीलदार आणि इतर महसूल अधिकारी यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कसलाही अंकुश राहिला नाही ते म्हणतील तोच कायदा अशी गत झाली आहे. धारूर येथे मोठ्या प्रमाणात देवस्थान इनामी जमिनीचे अवैध फेरफार झाले असून व त्याचप्रमाणे गायरान जमिनीचेही फेरफार व वेद खरेदी-विक्री करण्याचे प्रकरण सुद्धा समोर आली आहे.

तरी धारूर येथील देवस्थान इनामी जमिनी प्रकरणाला जबाबदार कोण या ? सर्व प्रकरणावर महाराष्ट्र राज्य व मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी लक्ष देऊन प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी व भूमाफियांवर तात्काळ चौकशी करून दोषींवर वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे गुन्हे दाखल करावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकातून केली आहे.



आज जालना येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थिती पिंनू डांगे यांचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश झाला. यावेळी युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे व कॉंग्रेस पक्षाचे इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



बीड : समाजसेविका डॉ.सीमा ओस्तवाल मॅडम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देते प्रसंगी, बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार व जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक, राजू वंजारे, छाया सरोदे, संपादक नितेश उपाध्याय, संपादक बालाजी जगतकर, समाजसेविका एकल महिला संघटनेच्या नेत्यांनी रुक्मिणी नागापुरे, सविता जैन, सुजाता सावंत, किश्किंदा पांचाळ, बाबासाहेब कोकाटे, पत्रकार ज्ञानोबा वायबसे, सामाजिक कार्यकर्ते विजय पोकळे, रवी धोंडगे आदी दिसत आहेत.

# अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या शासकीय निवासमधून चंदनाचे झाड चोरीला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या अपर जिल्हाधिकारी निवासस्थानातून चंदनाचे झाड चोरीला गेल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सध्या अश्विनी जिरंगे या अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी असून मागील तीन महिन्यापासून त्या स्वाराती वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील शासकीय निवासस्थानी आपल्या कुटुंबासह राहतात. दि. २३ जुलै २०२५ रोजी रात्री साधारणतः ३ वाजता त्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या आवारातील अंदाजे ३००० रुपये किमतीचे चंदनाचे छोटे झाड अज्ञात चोरट्याने चोरून नेले.

या चोरीची फिर्याद अश्विनी जिरंगे यांनी दिनांक २५ जुलै रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून कलम ३०३(२) अन्वये भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कांदे यांच्या कडे सोपविण्यात आला असून, शहरातल्या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या शासकीय वसाहतीत घडलेल्या या चोरीमुळे नागरिकांत चिंतेचे वातावरण पसरले आहे. पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

# पक्षाच्या माध्यमातून, मी शहराच्या विकासासाठी आणि लोकांच्या भल्यासाठी काम करत राहीन : शेख जफर राज (टेलर)

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात आज शेख जफर राज(टेलर) या भाजपा तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी भाजपा पक्षातील काही लावा लावी करणाऱ्या कार्यकर्ते ला आणि हमखास डावलले जात असल्याने



मा आ अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित यांच्या कार्याला प्रभावित होऊन राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला. भाजपा पक्षात असतांना या कार्यकर्त्यांने यापूर्वी अनेक सामाजिक कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांनी गोरगरिबांच्यासाठी घरकुल योजना मिळावी म्हणून शेवट पर्यंत त्या गोरगरीब नागरिकांना सहकार्य केले.

शासनाच्या लाडकी बहीण योजनेसाठी स्वखर्चाने मंडप टाकून लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरून घेतले, तरुण मुलांचे मतदान कार्ड बनवून घेतले, सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीला जाणे यामध्ये पीटीआर मिळवून देणे, जन्म प्रमाणपत्र मिळवून देणे, मृत्यू प्रमाणपत्र मिळवून देणे, जन्म मृत्यूची नोंद करणे, संजय गांधी श्रावण बाळ योजनेचे फॉर्म तहसील कार्यालय मध्ये जमा करणे,गोरगरीब नागरिकांना दवाखान्यात मदत करणे, तसेच वार्डातील स्वच्छता कडे तसेच पाणी प्रश्न असो किंवा लाईटचा प्रश्न असो आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या सामाजिक विषयावर काम केले आहे.त्यांचे वार्डातील नागरिकांमध्ये मोठे प्रभावी व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशा मुळे पक्षाला या वार्डात नवीन ऊर्जा मिळेल, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

शेख जफर राज(टेलर)सांगितले की, मी यापूर्वी वेगवेगळ्या स्तरावर सामाजिक काम केले आहे. आता, मला मोठ्या व्यासपीठावरून लोकांपर्यंत पोहोचायचे आहे. पक्षाच्या माध्यमातून, मी शहराच्या विकासासाठी आणि लोकांच्या भल्यासाठी काम करत राहीन. या पक्षप्रवेशामुळे, पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.पक्षाचे नेते आणि पदाधिकारी यांनी कार्यकर्त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## टिसी हरवला आहे

निलेश कैलाश शिंदे या नावाचा १० वी पासचा टीसी शिवराज पान सेटर ते पालवन चौक प्रवास करत असताना हरवला आहे. सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावा.

**निलेश कैलाश शिंदे**
९९२१६१५८३२

# वृक्षरोपण व संवर्धन करणे काळाची गरज : अनिल महाजन

धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्यामार्फत ५१ महाराष्ट्र बटालियनच्या सूचनेनुसार ग्रीनिंग इंडियाज वेस्टलँड कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथी पत्रकार अनिल महाजन एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधताना म्हणाले की, एनसीसीच्या माध्यमातून वृक्ष लागवड करून नापीक जमिनीला सुजलाम व सुफलाम बनविता येते. यातूनच पर्यावरणाचे संवर्धन होते. आजच्या युगात पर्यावरणाचे संवर्धन करणे काळाची गरज बनली आहे असे प्रतिपादन केले.




अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन करताना सांगितले की, एनसीसी कॅडेट्स शिस्तीचा असतो वृक्ष लावणे सोपे आहे. मात्र संवर्धन करणे अवघड असते. प्रत्येकाने वृक्षांचे संवर्धन करून ग्रीनिंग इंडियाज वेस्टलँड यामध्ये सहभागी होऊन भारताची नापीक जमीन हरितमय करावी असे सांगितले. तसेच या उपक्रमांतर्गत प्रत्येक कॅडेट्सने पाच वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाकरिता छात्र सेना अधिकारी हनुमंत मंत्रे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.एल.बी. जाधवर कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ यांबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थी व एनसीसी कॅडेट्सची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी तर आभार श्री. हनुमंत मंत्रे यांनी मानले.

# आंबेडकरी विचारांच्या परिप्रेक्ष्यात ; अण्णाभाऊ साठे

# अण्णाभाऊ हे आंबेडकरी साहित्याचे आद्य जनक.!

भारताच्या इतिहासात डोकावून पाहिलं तर निरनिराळे तत्त्वज्ञान, संस्कृती आणि त्यामागचा इतिहास आपल्याला पाहावयास मिळतो. असाच एक इतिहास आपल्या भारताला लाभला तो म्हणजे एका गावात दोन खेडे.! अर्थात अमानवी कृतीतून जन्मलेली जातीव्यवस्था. जातीयतेचे दाहक चटके सुमारे एक हजार वर्षांपासून सहन करत आलेल्या आणि अस्पृश्य म्हणून गणले गेलेल्या जातीत अण्णाभाऊंचा जन्म झाला. ते ज्या समूहातून येतात त्या समूहाला बुद्धकालीन संस्कृतिक ओळख आहे. परंतु सामाजिक स्थिती अतिशय भयानक आहे. अण्णाभाऊंना बालवयात या जाती संरचनेबद्दल अनेक कूटप्रश्न निर्माण झाले. वयाच्या दहा-अकरा वर्षात सामाजिक सुधारणा कशी असते याचे लौकिक अण्णाभाऊंना वाटे.! अण्णाभाऊ आपल्या वडिलांना म्हणजे भाऊराव साठेंना एक प्रश्न विचारतात की., आबा ह्या तुमच्या म्हमईस शिवाशिव हाय काय.? यावर अण्णांचे वडील उद्गारले हो.! हाय की शिवाशिव मांग, महार, चांभार या समद्या जातीची शिवाशिव चालत नाही. पुढे अण्णाभाऊंनी दुसरा प्रश्न विचारला., मंग आबा ह्या जाती कोणी पैदा केल्या. (?) देवानं का माणसानं. यावर भाऊराव म्हणाले अरं तूका देवानं समद्याले पैदा केलं. (!) पण माणसानं ह्या जाती पैदा केल्यांसा बघ. वडिलांचे उत्तर संपताच अण्णांनी पुन्हा प्रश्न विचारला मंग आबा तुम्हालाबी म्हमईस इथल्या वाणी वागवत असत्याल.? यावर त्यांच्या वडिलांनी सांगितले की तुका अरं बाबा,, हे पूर्वीपासून चालत आलंय आपण खालच्या जातीचे आपल्याला हे नियम मोडता येणार न्हाई. अण्णा पुन्हा उद्गारले आबा आपण कसं काय खालच्या जातीचे देवानं समद्याले एक सारखं पैदा केलं हाय. (!) देवाच्या देवळात जातानी खालच्या पायरी पासनच सुरुवात होते. मग यावर भाऊराव साठे म्हणाले तुका आपल्या जातीला बट्टा हाय आपण किती काहीही केलं तरी बी खालच्या जातीचे. पुढे बोलताना भाऊराव साठे म्हणाले अरे आपल्या जातीतले लोक महार, मांग, चांभार पोलिसात भरती हायत्या बघ त्यांना असली बंधने नाहीत लेका.! कवा पण कुणाच्या बी घरात, मंदिरात ते जाऊ शकतात. ते शिकलेली हाय बघ. म्हणून त्यांचं चालतंय. अण्णाभाऊंच्या बालमनावर गरीबी ही कुत्रीम आहे तिचा निःपात होऊ शकतो परंतु जातीचे बंधने संपली जाऊ शकत नाहीत. हे त्यांना ज्ञात झाले. व त्याचे प्रतिबिंब उमटले. अण्णाभाऊ हे वयाच्या अवघ्या दहा-अकरा वर्षाचे पण जातीसंस्थेचे दाहक चटके सोसून व त्या जळत्या निखाऱ्यातून त्यांना चालत जावे लागले. व्यवस्थेचे वाभाडे काढण्यासाठी पुढे त्यांची लेखणी नेपोलियन बोनापार्ट सारखी तळपली.



दिनांक ३१ मे १९३६ रोजी अखिल मुंबई इलाखा महार परिषद रमाबाई नगर नायगाव येथे पारपडली या परिषदेत बाबासाहेबांनी धर्मांतराबाबत एक मत आहे का.? हे तपासण्यासाठी सभा केवळ महार समाजाची बोलावली.! यात त्यांनी मुक्ती कोण पथे.(?) या भाषणातून धर्मांतराची ऐहिक कारणे सांगितली. बाबासाहेब म्हणतात., स्पृश्य व अस्पृश्य या दोन समाजातील जो कलह आहे, तो एका माणसावर होत असलेल्या आगळीकीचा प्रश्न नव्हे.! किंवा माणसावर होत असलेल्या अन्यायाचा प्रश्न नाही तर एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर चालविलेल्या अन्यायाचा हा प्रश्न आहे. जाती संस्थेचे उच्चाटन या आपल्या प्रसिद्ध ग्रंथाच्या प्रस्तावनेत बाबासाहेब लिहितात भारतातील लोकांना जर माझ्या या भाषणामुळे कळून चुकले की ते एका भयंकर रोगाने पछाडलेले आहेत; व त्यामुळे भारतातील इतर लोकांच्या आरोग्याला व सुखाला धोका निर्माण झाला आहे तर मला समाधान वाटेल. अर्थात जातीयतेची जाणीव होऊन ती नष्ट करण्यासाठी जो कोणी अनंत परिश्रम घेईल किंबहुना गुलामाला गुलामीची जाणीव होईल असा संघर्ष लढा बाबासाहेबांना अभिप्रेत होता.! उपरोक्त बाबासाहेबांचे हे विचार आण्णाभाऊंना पटले होते मार्क्सवाद हा जातीसंस्थेचे उच्चाटन करण्यास असमर्थ आहे तसाच तो अपूर्णही आहे. अशा मतात अण्णाभाऊंचे मत प्रवर्तीत झाले. अण्णाभाऊंनी आपल्या प्रसिद्ध खूळंवाडी या कथासंग्रहात, कोंबडी-चोर ही आंबेडकरी विचारदर्शनीक कथा लिहिली आहे. साधारणतः वरवर विनोदी वाटणारी पण विषमतेवर विद्रोही अस्त्रांचा प्रहार करणारी ही कथा आहे. या कथेचा नायक रामू आहे जो उपेक्षित समाजातून येतो. तो गावागावात जाऊन दुसऱ्याची कोंबडी तिसऱ्याला विकतो आणि आपली उपजीविका भागवतो. या कोंबडी चोरीबद्दल रामूला अनेक वेळा शिक्षाही झाली होती. एके दिवशी रामू रस्ते कडेला थंडीत शेकोटी करून बसला होता, तेवढ्यात समोरून दोन सदगृहस्थ चालत येत होते. त्यातील एक प्रस्थ हे शिक्षक (मास्तर) होते, तर दुसरे त्यांचे मित्र. मास्तर हे गांधीवादी असल्याचे दृश्य अण्णाभाऊ कथेत लिहितात. (कारण मास्तरांच्या डोईवर पांढरी टोपी आहे असा कथेत उल्लेख आढळतो.) मास्तर आणि रामू मध्ये बराच वेळ भांडवलशाहीवर चर्चा होते. रामूचे भांडवलशाही बद्दलचे उत्तर सडेतोड नि प्रखर होते.! आणि या दोघा उभयंतांमध्ये, यावर खूप संभाषण झाले. काही वेळानंतर रामू, मास्तर व त्यांचा सहकार्य दुसऱ्या गावाच्या दिशेने निघाले. इतक्यात मास्तरला एक चहाचे हॉटेल दिसले त्याने रामूला विचारले रामू तू चहा घेशील का.? यावर रामू हो बोलला.! आणि रामू हा खालच्या जातीचा म्हणून त्याला हॉटेलच्या बाहेर बसवले. व फुटक्या कपबशीत त्याला चहा प्यावयास दिला. रामूने मास्तरला हाक मारली आणि मास्तर हॉटेलच्या बाहेर आला व रामू कडे बघून म्हणाला बोल रामू.! रामू म्हणाला मास्तर तुम्ही म्हणता आपल्याला स्वराज्य मिळालं.! पण या कपबशी पैकी ते कोणाला मिळालं.? रामूने मास्तरला फुटकी कपबशी दाखवून हा प्रश्न विचारला. मास्तर निरुत्तर झाले. जे स्वराज्य राष्ट्राला प्राप्त झालं त्याचा फायदा उपेक्षित दलितांना का झाला नाही असा अप्रत्यक्ष प्रश्न अण्णाभाऊंनी उभा केला कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही दलितांवरील अत्याचार थांबले नव्हते व आजतागायात ते सुरु आहेत.! स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर ही जाचक वतन पद्धती देशात रूढ होतीच आणि या पद्धतीला हेच पददलित बळी पडले होते याची पुरेपूर जाणीव अण्णाभाऊंना होती. खरंतर बाबासाहेबांना राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक सुधारणा अधिक प्रिय होती.! बाबासाहेब म्हणायचे इथला उपेक्षित वर्ग समतेच्या अंगणात जोपर्यंत खेळणार नाही तोपर्यंत राजकीय सुधारणांना काहीच अर्थ उरणार नाही. हाच बाबासाहेबांचा उद्देश अण्णाभाऊंनी आपल्या कोंबडी-चोर या कथेत समुयोचीतपणे मांडला आहे. अण्णाभाऊंची विचारधारा कोणती हे शोधण्यापेक्षा अण्णाभाऊंची मानवी विकसित क्रांती कशी होती हे पाहणे अगत्याचे आहे. परंतु हे स्पष्ट आहे की अण्णाभाऊंनी आंबेडकरी क्रांतीची जाज्वल्य मशाल हाती घेऊन मानवधिकारसाठी निकाराची झुंज दिली.!

**क्रमश...**

**लेखक**
**आदर्शराजे विकासराव जोगदंड**
(कार्याध्यक्ष :- तथागत प्रतिष्ठान, बीड)

# एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम गीत-संगीताचा मोफत कार्यक्रम

## रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : एम.एम.शेख, एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

येत्या ३१ जुलै रोजी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या गीत-संगीताच्या मोफत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा गायक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.



गीत-संगीताचा हा कार्यक्रम पीस बुक डेपो चे संचालक, गायक तथा आयोजक एम.एम.शेख दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सादर करीत आहेत. त्यांच्यासोबतच प्रियंका भंडारी, आकाश जाधव, संध्या जाधव, निशा उजगरे, शेख मझहरोद्दीन, सय्यद मुजीब हे गायक-गायिका आपली गायन कला सादर करणार आहेत. एम.एम.शेख हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा कार्यक्रम विना खंड सादर करीत आहेत. दरवर्षी या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांची उत्स्फूर्त उपस्थिती असते. दिवसेंदिवस या कार्यक्रमाची लोकप्रियता वाढत चालली आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमात सहभागी असणारे सर्व गायक कलाकार विनामूल्य हा कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मरहूम मोहम्मद रफी यांना श्रद्धांजली वाहतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा सदाबहार गीतांचा मोफत कार्यक्रम येत्या गुरुवार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी बीड शहरातील जालना रोड स्थित हॉटेल हिना इंटरनॅशनल समोर, असलेल्या संग्राम हॉटेल -/ल हॉल, जालना रोड, बीड येथे सायंकाळी ६:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात बीड जिल्हा परिषदचे वरिष्ठ सहाय्यक युसूफ पठाण यांची विशेष उपस्थिती राहणार असून साऊंड सिस्टिम ची जबाबदारी नेहमीप्रमाणे कृष्णा पांगरे सांभाळणार आहेत. तरी रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा गायक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

# ॲड. प्रकाश कवठेकर यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५ जाहीर

पुणे । प्रतिनिधी

बीड येथील तेजस ग्रुप चे चेअरमन माजी जि प सदस्य ड प्रकाश दादा कवठेकर यांना के पी एम मीडिया पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.



थोडक्यात माहिती बीड येथील तेजस उद्योग समूहाचे चेअरमन व माजी जि प सदस्य ॲड. प्रकाश दादा कवठेकर यांना ऑक्सीतेज मिनरल वॉटर या ब्रँड साठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तेजस बेवरेजेस या कंपनीच्या अंतर्गत ऑक्सितेज मिनरल वॉटर मार्केटिंग प्रोडक्शन क्वालिटी हे या कंपनी ने जपले आहे, सर्वसामान्य कुटुंबामध्ये येऊन बीड जिल्ह्यामध्ये स्वत:चा ब्रँड निर्माण करण्याचे काम दादांनी केला आहे.

आज मीतिला तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस बेवरेजेस, तेजस इंडस्ट्रीज, तेजस अर्बन, तेजस अर्बन मल्टिनिधी, राजनंदनी अर्थमूव्हर्स इत्यादी कंपनी स्थापन करून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध केला आहे. ही कंपनी ग्रामीण भागात उभा करून शेकडो मुलांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. आज मितीला मराठवाडा व शेजारील जिल्ह्यामध्ये वितरण होत आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सिने अभिनेत्री प्रार्थना बेहेरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न होत आहे.

हा सोहळा दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल राजमुद्रा एचपी पेट्रोल पंपाच्या मागे मारुंजी गाव हिंजवडी पुणे या ठिकाणी संपन्न होत आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध मान्यवर मित्रपरिवार यांच्या वतीने ड प्रकाश दादा कवठेकर यांचे अभिनंदन होत आहे.

# पत्रकार रंजीत घाडगे यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे सत्कार



केज । प्रतिनिधी

पुरोगामी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी पत्रकार रंजीत घाडगे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.पी.आय.) च्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आर.पी.आय. तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, सरचिटणीस गौतम बचुटे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे, नाना गायकवाड, आय.टी.सेल तालुकाध्यक्ष सुरज काळे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास पत्रकार सचिन भालेराव, पत्रकार प्रदीप गायकवाड, उत्कर्ष काळे, विनोद गायकवाड, अनंता काळे, तुपारे व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम बचुटे यांनी केले, आभार प्रदर्शन ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे यांनी केले, तर मनोगत तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी व्यक्त केले. या सत्कार सोहळ्यात वक्त्यांनी रंजीत घाडगे यांच्या पत्रकारितेतील कार्याची प्रशंसा करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उद्योजक तथा लेखक प्रकाश सुलाखे डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती पुरस्काराने सन्मानित

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मूळचे रहिवाशी तथा पुणे येथील कॅडमॅक इंजिनिअरिंग प्रा लि चे उद्योजक तथा लेखक प्रकाश आत्माराम सुलाखे यांना डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती पुरस्कार २०२५ या प्रतिष्ठित पुरस्कार सन्मान सोहळ्यात गेस्ट ऑफ ऑनर म्हणून गौरविण्यात आले आहे तसेच कॅडमॅक इ इंजिनिअरिंग प्रा लि या कंपनीला प्रथम पुरस्कार टॉप ब्रँड इन इंजिनिअरिंग एज्युकेशनल लॅब इक्विपमेंट मॅन्युफॅक्चर म्हणून देण्यात आला आहे. टॉपनॉच फाउंडेशन आयोजित या कार्यक्रमाला अनेक मान्यवर व्यक्तींनी उपस्थिती लावली होती. या सोहळ्यात प्रकाश सुलाखे यांच्यासोबत प्रसिद्ध अभिनेता आणि समाजसेवक सोनू सूद, खा तथा माजी मुख्यमंत्री नारायण राणे, तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नारवेकर, फाऊंडेशनचे सीईओ करूनसिंग व पदाधिकारी उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात भारतभरातील विविध प्रतिष्ठित उद्योजकांना सन्मानित करण्यात आले आहे.

शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी असलेले उद्योजक आणि लेखक प्रकाश आत्माराम सुलाखे यांच्या दुसऱ्या पुस्तकाचे Engineering Education: Pain or Gain या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई येथील प्रसिद्ध हॉटेल ताज येथे एका भव्य आणि प्रतिष्ठित समारंभात झाले. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री खा.नारायण राणे आणि प्रसिद्ध अभिनेता व समाजसेवक सोनू सूद,




विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, फाऊंडेशनचे सीईओ करून सिंग यांच्या उपस्थितीमुळे या क्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

भारतातील अभियांत्रिकी शिक्षणातील आव्हाने आणि भविष्यातील संधी यावर आधारित हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी, शिक्षकांसाठी आणि धोरणकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. तांत्रिक शिक्षणाच्या नवविचार आणि परिवर्तनासाठी प्रकाश सुलाखे यांचा हा प्रयत्न एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. इंजिनिअरिंग क्षेत्रातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पुस्तके अभ्यासपूर्ण असणार आहेत,यापूर्वी देखील सुलाखे यांना पणजी येथे गोव्याचे मुख्यमंत्री, प्रसिद्ध अभिनेत्री खा हेमा मालिनी यांच्या हस्ते बेस्ट उद्योजक म्हणून गौरविण्यात आले होते. त्यांच्या या यशाचे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, प्रसिद्ध विधिज्ञ कालिदास थिगळे, लोकप्रश्नचे संपादक दिलीप खिस्ती, जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, प्रमोद कुलकर्णी, विकास उमापूरकर, मिलिंद सुंदर, उदय जोशी, दीपक सर्वज्ञ, दिव्यअग्नी चे संपादक प्रकाश सुर्यकर, कार्यकारी अभियंता शिवप्रसाद खेडकर, दिनकर कदम, विलास बडगे, अरुण डाके, नानासाहेब काकडे, गणपत डोईफोडे, गंगाधर घुमरे, गिरीश देशपांडे, साहस अदोडे यांच्यासह बीड येथील पत्रकार आणि मित्र परिवाराने कौतुक केले आहे, माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे पीआरओ प्रशांत सुलाखे यांचे ते लहान बंधू आहेत.

# २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार पत्रकार तात्या गवळी यांना जाहीर

केज । प्रतिनिधी



२०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार पत्रकार तात्या गवळी यांना नुकताच जाहीर झाला असून दिनांक १ ऑगस्ट रोजी २०२५ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै. प्रमोद लांडगे युवा मंचया वतीने दलित चळवळीतील लढाऊ कार्यकर्त्यांना व दलित चळवळीला आपल्या दमदार व धारदार लेखणीच्या माध्यमातून न्याय देणाऱ्या पत्रकारितेतील नामांकित पत्रकार यांना लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार प्रत्येक वर्षी देण्यात येत असल्याने यावर्षीचा कै. प्रमोद लांडगे युवा मंचच्या वतीने देण्यात येणारा २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार हा पत्रकार तात्या लहू गवळी यांना नुकताच जाहीर करण्यात आला आहे.

दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी सिद्धार्थ नगर, केज येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमांमध्ये पत्रकार तात्या गवळी यांना लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. असे २०२५ च्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रेम लांडगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे. या निवडीबद्दल पत्रकार तात्या गवळी यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.



किल्ले धारूरमध्ये धारूर ते चिंचपूर रोडवर लोकशाहीर आणाभाऊ साठे या चौकाची स्थापना करण्यात आली आहे.

# केज शहराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.गट) इनामदार अझरोद्दीन बशिरोद्दीन शेख यांची निवड

केज । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अ.प.गट) केज शहराध्यक्षपदी इनामदार अझरोद्दीन बशिरोद्दीन शेख यांची निवड दि.२८ जुलै २०२५ रोजी करण्यात आली आहे. त्यांना जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे, माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांच्या आदेशावरून पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांनी इनामदार अझरोद्दीन यांच्यावर केज शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे.

केज शहरातील वॉर्ड क्रमांक एकचे लोकप्रिय नगरसेवक म्हणून इनामदार अझरोद्दीन यांची ओळख आहे. त्यांनी मागील अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. त्यांचे युवकांचे संघटन मोठे आहे. त्यांच्या निवडीचा पक्षाला फायदा होणार असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. पक्षाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार तळागाळात पोहचवून पक्ष वाढीसाठी व सर्व सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे इनामदार अझरोद्दीन यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून सर्वत्र उत्स्फूर्द प्रतिसाद मिळत आहे.

# उपळी येथे मानवी हक्क अभियानाच्या शाखेचे उद्घाटन

वडवणी । प्रतिनिधी

आज वडवणी तालुका रुई पिपळा लोनवळ तांडा उपळी येथे मानवी हक्क अभियानाच्या शाखेचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात करण्यात आले. मानवी हक्क अभियान वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू बप्पा मुजमुले यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले.



प्रमुख उपस्थिती मानवी हक्क अभियानाचे जिल्हा सचिव आप्पाराव मुजमुले, ऊसतोड मजूर तालुका अध्यक्ष बप्पासाहेब पाटोळे, उपाध्यक्ष पाटोळे भाऊ, मा ह अ बालाजी इचके, महिला आघाडी तालुका अध्यक्ष सागर बाई इचके, लहू इचके, युवा नेता बंडू नाना मुजमुले, शहराध्यक्ष उद्धव आव्हाड, विद्यार्थी आघाडी प्रदीप आवाड, आपला सहकारी मानवी हक्क अभियान सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष आदर्श मुजमुले सर्व तालुका कार्यकर्ते, पदाधिकारी, उपस्थित होते.

### वकील संघ उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत

# एक दिवसीय प्रादेशिक गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम




छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दिनांक २५ जुलै २०२५ रोजी वकील संघ उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत एक दिवसीय प्रादेशिक गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम वकील संघाच्या वतीने घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन वकीलसंघाच्या अध्यक्षा ॲड.सौ.योगिता क्षीरसागर (थोरात), उपाध्यक्ष ॲड. एस.एन.मोरमपल्ले सचिव ॲड.श्रीकृष्ण चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून सी.डी.एस.एल.आय.पी.एफ अधिकारी स्नेहल पलांडे यांनी उपस्थित विधीज्ञ यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले. यात त्यांनी विधीज्ञ यांना सेबी तसेच सी.डी.एस.एल.ची कार्यप्रणाली विशद केली तसेच बचत व बचतीचे महत्त्व समजावून सांगितले. डिमॅट अकाउंट, शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व ऑनलाईन फ्राड पासुन सावधगिरी बाळगावी यासाठी मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना सर्वांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विधीज्ञ मंडळी यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन केले. या कार्यक्रमास जेष्ठ विधीज्ञ व्हि.डी.सोळंके अध्यक्ष बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अण्ड गोवा वरीष्ठविधीज्ञ व्हि.डी.सपकाळ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेबीचे सेक्युरीटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी केले.

# मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप : तुकाराम आचार्य

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील व सिरसाळा परिसरातील गेल्या अनेक वर्षापासून स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब याच्या सोबत राहिलेल हे गाव आहे. आज ना.पंकजाताई मुंडे यांच्या सोबत आजपण खबिर पणे उभ आहे. यावेळी आचार्य टाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप व वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



यावेळी माजी पंचायत समिती सदस्य मोहन आबा आचार्य, सरपंच रामभाऊ तात्या घोडके, उपसरपंच अंगद जिजा आचार्य, चेअरमन तथा संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य तुकाराम आचार्य, विठ्ठल आणा घोडके, आर.बी. आचार्य, बाळासाहेब किरवले, उमेश आचार्य, वष्चिट काकडे, बलभीम घोडके, राधाकिसन शिंदे, बाळासाहेब धनेगावकर, बंडू आचार्य, लिंबाजी किरवले, वसंतराव घोडके, रामचंद्र आचार्य, अनिल आचार्य, उमेश घोडके, अनिल गांगर्डे, कमलाकर काकडे, रामभाऊ आचार्य, लतिपान आबा काकडे, बालासाहेब बोराटे, अशोक रगडे, केशव खोडवे, गोविंद सरवदे, रखमाजी गवळी तसेच जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक शिंदे, मडके, तोरकड, सर्व गावकरी मंडळी आदी उपस्थित होते.

# इनवरव्हील क्लब परळी वैजनाथच्या कार्याचे पुण्यात गौरव अध्यक्ष श्रद्धा हालगे यांना बेस्ट प्रेसिडेंट पुरस्कार

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी इन्वरव्हील क्लब ऑफ परळी वैद्यनाथाचे अध्यक्ष सौ श्रद्धा नरेश हालगे यांना बेस्ट प्रोसिडिंग हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला असून. त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

पुणे येथे पार पडलेल्या इनवरव्हील डिस्ट्रिक्ट ३१३ च्या ४१ व्या वार्षिक अधिवेशनात त्यांचा सन्मान करण्यात आला. या अधिवेशनात डिस्ट्रिक्ट मधील सर्व क्लबच्या अध्यक्षांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाला उद्योजक रांका, मा.चेरमन आशा देशपांडे, नेत्रा बक्कड, सुष्मिता चाकोते तसेच असोसिएशनच्या चेअरमन यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी भावना व्यक्त करताना श्रद्धा हालगे म्हणाल्या. गेल्या १५ वर्षापासून इन्वरव्हील च्या कार्यात सक्रिय आहे. अध्यक्षपदाचा अनुभव नसतानाही माझ्या कामावर विश्वास दाखवत मला संधी दिली. या सन्मानामुळे माझ्या मेहनतीला खरी पावती मिळाली आहे.





# मूकबधिर निवासी विद्यालयाच्या मतिमंद व मूकबधिर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व अल्पोहाराचे वाटप

केज । प्रतिनिधी

लोकशाहीर, सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्यासह उपस्थितीमध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न झाले. त्याचप्रमाणे मतिमंद व मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व अल्पपोहाराचे वाटप करण्यात आले. केज शहरातील सिद्धार्थ नगर भागामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै.प्रमोद लांडगे युवा मंचच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रोहित कसबे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रीतम खरात, पत्रकार दशरथ चवरे, पत्रकार तात्या गवळी, युवानेते लखन हजारे, पत्रकार विवेक बनसोड, किरण जोगदंड वंचितचे प्रवीण मस्के यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.

यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला व उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच मतिमंद व मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व अल्पपोहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी मतिमंद निवासी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जनाबाई जाधव, मूकबधिर निवासी विद्यालयाच्या सूर्यवंशी, काकासाहेब जगदाळे, अशोक सुरवसे, विशाल कदम, दुबक पवार, बोधले, पवार, शिंदे, श्रीमती आंधळे, श्रीमती जाधव, पालवे सर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# १५९ कोटींच्या नगररोडचे निकृष्ट काम; अवघ्या ४ महिन्यांत पडले खड्डे!

## गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह ; डागडुजी करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न; चौकशी करून कारवाईची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांना जोडणाऱ्या नगररोडच्या २४.५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम जून २०२४ मध्ये सुरू झाले. तब्बल १५९ कोटी रुपये खर्च करून हे काम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच, अजून पूर्णही न झालेले रस्ते फक्त चार महिन्यांतच खचू लागले असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच रस्त्यावर खड्डे पडल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे. प्रशासनाने तातडीने डागडुजी करून विषय थोपवण्याचा प्रयत्न केला असला, तरी कामाच्या निकृष्ट



दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी बीड आणि महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, दोषींवर कठोर कारवाईसह सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### कामात विलंब, दंड ठोठावूनही नाही सुधारणा

हे रस्ते काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छक-ख) अंतर्गत साकेत कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिले असून, डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र वेळेत काम पूर्ण न झाल्याने आता नोव्हेंबर २०२५ ही नवीन डेडलाईन दिली आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला होता. तरीदेखील कामाच्या गतीत किंवा गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली दिसून येत नाही.

### गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; चौकशी करा, अन्यथा आंदोलन! – डॉ. ढवळे

शहरातील सर्वांत महत्त्वाचा, शासकीय कार्यालये आणि नागरी वर्दळीचा रस्ता चार महिन्यांतच खचू लागल्याने संपूर्ण यंत्रणेला धक्का बसला आहे. प्रशासनाकडून केलेली डागडुजी म्हणजे निकृष्ट काम झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे, असा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी दोषींवर कठोर कारवाई आणि सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# आष्टी तालुक्यातील इतर तांड्यावरही प्रशासन शोध मोहीम राबवणार का?

आष्टी । प्रतिनिधी

सेवालाल लमाणतांड्यावर १५ बालकांना स्वताच्या घरी वेठबिगारीची कामे करायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. यानंतर या परिसरातील तांड्यावर जाऊन देखील शोध घ्यायला हवा होता. पण प्रशासनाने एकाच ठिकाणी कारवाई झाल्यानंतर कसलीच हालचाल न करता कारवाई करून मोकळे झाले. पण आता तालुक्यातील इतर तांड्यावर देखील शोध मोहीम राबवली जाणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.
आष्टी तालुक्यातील सेवालाल लमाणतांड्यावरील गेल्या अनेक वर्षांपासून रायगड, मावळ, यासह इतर जिल्ह्यातून कोळसा भट्टीवर कामासाठी आणलेल्या आदिवासी मजुरांना कर्नाटक येथे पाठवून त्याची मुले शेठजी नी स्वताच्या घरी वेठबिगारीची कामे करण्यास ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर प्रशासनाने कारवाई करत विविध कलमानुसार शेठजींवर गुन्हे दाखल करून त्याची कारागृहात रवानगी केली. पण आता सेवालाल लमाणतांड्यावर जसे धाडसत्र टाकले.
तसेच तालुक्यातील वाघळुज, जोमदरा, देऊळगावघाट, कारखेल तांडा, तागडखेल येथील नाथनगर यासह अन्य तांड्यावर देखील धाडसत्र टाकून शोध मोहीम राबवायला हवी होती. पण प्रशासनाने इतर तांड्यावर कसलीच भुमिका घेतली नाही. आता तरी प्रशासन तालुक्यातील लमाणतांड्यावर धाडसत्र टाकून शोध मोहीम राबवणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



# सावधान रस्ता खचला आहे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरापासून तथागत चौक मार्गे सेलूअंबा गावाकडे जाणाऱ्या एका वळणावर रस्ता खचला असून सदरील रस्त्यावरून खबरदारी घेण्याची गरज आहे. थोडक्यात माहिती अशी की, तथागत चौकापासून पोखरी गाव आणि सेलूअंबा कडे ग्रामीण भागातील लोकांची मोठ्या प्रमाणात ये–जा होत आहे. याच रस्त्यावरून लातूर कडे जाणारा मधला मार्ग म्हणून दुचाकी, चारचाकी वाहन धारक टोल नाका वाचवण्यासाठी या रस्त्यावर मोठी वर्दळ सूरू आहे. मात्र पोखरी गावाकडे जाणाऱ्या हद्दीतील रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडून रस्त्याची चाळणी झाली आहे.
यामुळे पिताजी सारडा नगरीच्या पाठीमागून जाणाऱ्या सेलूअंबा रस्त्याचा पर्याय येथील नागरिकांनी निवडला असून मात्र चार दिवसापूर्वी झालेल्या पावसाने जोगाई वाडी, सेलू अंबाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या शेतातील सखल भागात पाणी जमा झाले आहे. तर याच रस्त्यावर एका वळणावर पुलानजीक डांबरी रस्ता खचला आहे. पुलाखालून छोटी नदी वाहते. याठिकाणीच भूसख्खलन सारखा प्रकार घडला असून हा अर्धा रस्ता खचला आहे. त्यामुळे सदरील रस्ता रहदारीस धोकादायक झाला असून वाहनधारकांनी येथून ये–जा करताना सावधगिरी बाळगावी असेही सुचित करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचाराचा कळस ? पाण्यासारखा पैसा पाण्यात घातल्याने देव दहिफळ मधील रस्ते पाण्याने माखले

धारुर । प्रतिनिधी

सत्तेवर बसल्यास सत्ता कशी चालवून स्वतःची घरे भरायची हे पाहायचे असेल तर धारूर तालुक्यातील मौजे देवदयफळ ग्रामपंचायत चे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. गत दोन अडीच वर्षापासून सौ स्मिता श्रीधर बडे ह्या लोकनियुक्त सरपंच असून त्यांचा सर्व आर्थिक कारभार प्रतीच पाहतात मग विकास कामे असो की आर्थिक देवाण–घेवाण. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य व केंद्र सरकार ग्रामपंचायतला भेट निधी वितरित करत असल्याने अनेक सरपंच कसे मालामाल झालेलं पाहायला मिळतात. कृष्णाच्या वित्त आयोग नरेगा दलित वस्ती घरकुल या सर्व कामांचे देदे फळ ग्रामपंचायत मध्ये ३ १३ ९ १२ वाजलेली ग्रामस्थांना विकासाच्या संकल्पनेपासून खूप दूर राहावे लागत असल्याचे चित्र दिसत आहे.
अनेक वर्षापासून ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले रमेश आनंद देशमुख हे तर मुख्यालय न राहता लातूर अथवा अंबाजोगाई येथे वास्तव्य करून इथला कारभार हप्तात त्यामुळे विकासाला खेळ बसत असून ग्रामस्थांनी कॉल केल्यास त्या कॉल ला उत्तर देण्याची दानत सुद्धा देशमुख दाखवत नाही राज्य वाक्याचा सरकार जेवढ्या योजनांसाठी निधी उपलब्ध करून देते त्यातील एकही योजना देव–देवता ग्रामपंचायत मध्ये नीट राबवली जात नाही



त्यामुळे असून अडचण नसून खांबा अशी स्थिती गावाची झालेली आहे त्याला कारणही तसेच आहे ते म्हणजे निष्क्रिय ग्रामसेवक रमेश आनंदराव देशमुख व राजकीय सरपंच बडे. एकच काम करून त्यासाठी दोन दोन हेड मधून खर्च केल्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत.
लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी गावात रस्ते पाणी वीज आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधा देणे क्रमप्राप्त असते परंतु त्यातील एकही इथं नियमाप्रमाणे होत नाही. एखाद्या कामासंदर्भात ग्रामसेवक रमेश आनंदराव देशमुख याला विचारणा केल्यास ते ग्रामस्थांना जेलमध्ये टाकण्याची भाषा वापरतात. जागृत देवस्थान श्रीक्षेत्र खंडोबा इथं असल्याने फार दूर धरून लोक खंडोबाच्या प्रति लीन होण्यासाठी येत असतात त्यामुळे सहाजिकच गावची ख्याती सर्वदूर पोचलेली आहे तरीही विकास कामात अपेक्षित प्रगती करण्यात अपयश येत आहे वरून पैसा येतो खाली खर्च होतो विकास होत नाही मग पैसा जातोच कोठे याचाही सारासार विचार होणे गरजेचे आहे.
जवळपास अडीच हजार लोकसंख्या असलेल्या या गावात एकूण पाच दलित वस्ती असून एकाही वस्तीला कोणतीच योजना पोचलेली नाही उलट समाज मंदिरात रंगरंगोटी करून वित्त आयोगातून दीड लाख रुपये खर्च केल्याची चर्चा गावात होत आहे आतापर्यंत विकासाच्या नावाखाली जिथे जिथे पैसा खर्च केला त्याची हेडवाईज चौकशी केल्यास भ्रष्ट ग्रामसेवक व त्याचे साथीदार यांना जेल चा रस्ता मात्र दूर नाही म्हणून सर्वच कामाची सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती कार्यक्रम

गेवराई । प्रतिनिधी

क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती तसेच महिला कार्यकर्त्यांना प्रशिक्षण कार्यक्रम ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती कुटे नायब तहसीलदार गेवराई तर प्रमुख पाहुणे विलास मगरे विभागीय समन्वयक (कोरो इंडिया), आप्पासाहेब कानगुडे नगरसेवक गेवराई, श्रीमती शारदा डोईजड, मनोहर चाळक सामाजिक कार्यकर्ते गेवराई, ॲड. संदेश पोतदार, बंडू खरात, अनिल आबा मस्के रोजगार सेवक हे होते. महात्मा गांधी रोजगार हमी योजने मध्ये ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग या आधारे त्यांना रोजगार मिळवून देऊन त्यांना त्यांच्या संसारात आर्थिक आधार मिळवुन देण्यास व रोजगार देण्यास ग्राम पंचायत कडे नमुना नंबर ४ मध्ये अर्ज कसा करायचा याबद्दल सविस्तर माहिती दिली.
पंचायत समिती कडून सरकारी नियमानुसार शंभर दिवस रोजगाराची हमी असल्यामुळे ज्यांना रोजगाराची आवश्यकता आहे अशा ग्रामीण भागातील महिला मजूर व इतरांना रोजगार मिळू शकतो याचीही माहिती व आपले हक्क आपले अधिकार याची माहिती दिली. महिला सक्षमीकरण व आर्थिक विकास याची सविस्तर माहिती श्रीमती शाहीन असलमखाँ पठाण यांनी सर्व महिलांना त्याची सविस्तर माहिती दिली. श्रीमती शारदा डोईजड यांनी जमलेल्या महिलांना पीएम विश्वकर्मा योजना व पीएम किसान कौशल्य विकास योजना यांची सविस्तर प्रशिक्षण कसे प्राप्त करून घ्यावे व बँक लोन साठी कागदपत्राची पूर्तता कशी करावी याची माहिती दिली. श्रीमती कुटे नायब तहसीलदार गेवराई यांनी आलेल्या महिलांना तहसीलच्या अनेक योजनाची सविस्तर माहिती दिली. मनोहर चाळक सामाजिक कार्यकर्ते गेवराई यांनी जमलेल्या महिलांना प्रत्येक योजनेचा लाभ कसा घ्यावा व त्यासाठी आपली कुठेही अडवणूक झाली तर पूर्ण मदत करण्याची हमी व ते काम पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची हमी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे.
ॲड. संदेश पोतदार यांनी एकल महिला, विधवा महिला, दिव्यांग महिला यांना कोर्ट दरबारी कोणतीही अडचण निर्माण झाली तर त्यासाठी लागणारे कागदपत्र व कायदेशीर सल्ला देण्याचे आपल्या भाषणात व्यक्त केले आहे.
कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तुकाराम गवारे पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती शीतल गोचडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गवारे पाटील, मनीषा शरणागत, अंजुम इसाक सय्यद, शकुंतला घुन्गासे, धापसे, स्वर्णा मस्के, वहिदा शेख, मोहन धुरन्दरे, शेख नफीस, शेर–ए–हिंद ब.उ.से. संस्थाचे संस्थाप्रमुख शेख आमेर पाशा यांनी परिश्रम घेतले.

# उस्मानीया फाउंडेशन धारूरच्या कार्यकर्त्यांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये घेतली रुग्णांची भेट

धारूर । प्रतिनिधी

समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या उस्माने फाउंडेशन, किल्ले धारूर (जिल्हा बीड) या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आज सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.
या उपक्रमांतर्गत फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी सिव्हिल हॉस्पिटलमधील प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघमारे सर, तसेच प्रेमानंद स्वामी सर व आमुल राऊत सर यांच्याशी रुग्णांच्या आरोग्यविषयक समस्या, उपलब्ध सुविधा आणि उपचार व्यवस्थेबाबत थेट संवाद साधला. रुग्णांची अडचण समजून घेत त्यांच्या तक्रारी आणि गरजा अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवल्या. फाउंडेशनचे प्रतिनिधी म्हणाले, आम्ही



केवळ अन्न, कपडे किंवा आर्थिक मदतीपुरते मर्यादित नाही, तर रुग्णांची मानसिक, सामाजिक आणि वैद्यकीय बाजू समजून घेत त्यांच्यासाठी मार्गदर्शन, मदत आणि साथ देण्याचा आमचा हेतू आहे. यावेळी उपस्थित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी उस्माने फाउंडेशनच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.
फाउंडेशनच्या हस्तक्षेपामुळे रुग्णांवर अधिक प्रभावी उपचार मिळू लागले आहेत, असे मत रुग्णांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केले. डॉ. वाघमारे सर, प्रेमानंद सर आणि आमुल सर यांनी देखील उस्मानीया फाउंडेशनच्या कार्याची प्रशंसा करत, फाउंडेशनच्या पुढील योजनांमध्ये ग्रामीण व शहरी भागांतील आरोग्य जनजागृती, रक्तदान शिबिरे, अपंग व गरजूंसाठी वैद्यकीय सहाय्य आणि मोफत तपासणी शिबिरे घेण्याचा मानस आहे. सामाजिक बांधिलकी आणि रुग्णांच्या सेवेसाठी प्रेरणास्थान ठरलेली उस्माने फाउंडेशन, किल्ले धारूर ही संस्था भविष्यातही जनतेसाठी निःस्वार्थ सेवा देत राहणार आहे. सामाजिक संस्था जर अशा पद्धतीने कार्य करत असतील, तर रुग्णसेवा अधिक व्यापक आणि दर्जेदार होईल, असे मत व्यक्त केले.

# केज येथून अमर देडे या व्यक्तीने एका अल्पवयीन मुलीस फूस लाऊन पळवून नेले

## दहा दिवस उलटून गेले तरी अजूनही आरोपी व मुलीचा थांगपत्ता नाही; पोलीस प्रशासनाने शोध मोहीम वेगवान करण्याची आवश्यकता

केज । प्रतिनिधी

केज शहरातील सिद्धार्थ नगर भागात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीस फूस लाऊन पळवून नेल्याची घटना घडली असून त्यासंबंधीची तक्रार केज पोलिस ठाण्यात देण्यात आलेली आहे. यासंबंधीचे निवेदन २८ जुलै रोजी नातेवाईकांमार्फत तहसीलदार, केज तहसील कार्यालय, केज पोलीस स्टेशनला देण्यात आलेले आहे.
याविषयी सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील सिद्धार्थ नगर भागातील ११ वी उत्तीर्ण असलेल्या एका १७ वर्षाच्या मुलीला २० जुलैच्या मध्यरात्रीला ०२:०० वाजता आरोपी अमर राजाभाऊ देडे वय ४० ते ४२ वर्षे असून त्याचा व्यवसाय बांधकाम मजूर आहे. केज शहरातील रामोशी गल्ली, अजीजपुरा येथे राहणाऱ्या या व्यक्तीने संबंधित अल्पवयीन मुलीस फूस लावून पळून नेल्याची धक्कादायक घटना घडलेली आहे.
अमर राजेभाऊ देडे याला दोन बायका असून एक बायको बीड येथे वास्तव्यास आहे. एका बायकोपासून




या व्यक्तीला तीन मुले असून दोन्ही बायकांना तो नांदवत नसल्याचे सांगण्यात येत आहे. आपल्या दोन्ही बायकांना नांदवायचे सोडून एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याबद्दल केज पोलीस स्टेशनमध्ये संबंधित व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. या प्रकरणाला आठ ते दहा दिवस उलटून गेले असून, अजूनही संबंधित मुलीला व त्या व्यक्तीला शोधण्यामध्ये विलंब लागत असून त्यासंबंधीची तात्काळ शोध मोहीम पोलिसांमार्फत व्हावी व संबंधित मुलीला पळून नेण्यासाठी मदत करणाऱ्या जीप ड्रायव्हरचा शोध घेऊन त्याला देखील सह आरोपी करण्यात यावे. या गुन्ह्यांमध्ये शामिल असणाऱ्यांना शोधून कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी. यासंबंधीचे निवेदन २८ जुलै रोजी नातेवाईकांमार्फत तहसीलदार, केज तहसील कार्यालय, केज पोलीस स्टेशनला देण्यात आलेले आहे. यावेळी बाबुराव गालफाडे सर, सुरेश लांडगे, दीक्षा चंद्रकांत लांडगे, सूर्यकांत शिवाजी लांडगे, राजू रवींद्र लांडगे, तानाजी रतन पौळ, रोहन चंद्रकांत लांडगे, रवींद्र शिवाजी लांडगे, कृष्णा मोहन लांडगे, बळीराम महालिंग लोंढे, मीरा सूर्यकांत लांडगे इत्यादि उपस्थित होते.

# साबलखेडचा बसस्थानक निवारा पाडणारे अद्यापही मोकाटच

## शालेय विद्यार्थ्यांसह प्रवासी भर पावसात ताटकळत उभे लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची ग्रामस्थांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील साबलखेड येथील अहिल्यानगर बीड मार्गावरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत आमदार फंडातून बांधण्यात आलेला बस प्रवासी निवारा व उपहारगृह गावातील काही अज्ञात व्यक्तीने पाडून त्याचे वीट पत्रे लोखंडी अँगल व पाईप लंपास केले आहे. प्रवासी व शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बस स्थानक नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह प्रवाशांना भर पावसात बसची वाट पाहत भर पावसात ताटकळत उभे राहावे लागत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे प्रवाशासह ग्रामस्थांतून संताप व्यक्त केला जात आहे. बस स्थानक पाडणाऱ्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे.
तालुक्यातील साबलखेड या गावासह अनेक ठिकाणी माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी आपल्या आमदार फंडातून बस थांबा बांधले होते. त्यामुळे प्रवाशांना ऊन वारा पाऊस यापासून संरक्षण मिळत होते. सध्या पावसाळ्याचे दिवस



असल्याने व बस थांबा पाडल्याने प्रवाशांना भर पावसात बसची वाट पाहत ताटकळत उभे राहावे लागत आहे. यातच सकाळी शाळा असल्याने लहान मुलांना भर पावसात भिजून भिजलेल्या अंगानेच शाळेत जावे लागत आहे यामुळे ग्रामस्थ व प्रवाशातून संताप व्यक्त केला जात आहे. साबलखेड बस स्थानक पडल्याप्रकरणी काही ग्रामस्थांनी आष्टी येथील आगार प्रमुख यांना माहिती दिली होती. आगार प्रमुख यांनी सदरील प्रकरणी अंभोरा पोलीस स्टेशनला कारवाईबाबत पत्र पाठवले होते. तरीही संबंधितावर कारवाई झालेली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तसेच बसस्थानक पाडल्यानंतर बस स्थानक व परिसरात मुरुमाचा भराव टाकल्याने जाणीवपूर्वक बस स्थानक पाठीमागील रस्ता ही बंद करण्यात आला आहे. बस स्थानक पाडून तेथे मोठ्या प्रमाणावर रॉयल्टी न भरता मुरूम टाकण्यात आलेला आहे.
बस स्थानकाजवळच महामार्गावरील पूल असून पुलाच्या नळकांड्या एका बाजूने बूजल्याने येथे येणारे पावसाचे पाणी साबलखेडचे ग्रामदैवत संत बाळूदेव महाराज यांच्या मंदिरात व परिसरात जमा होत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदरील बस स्थानक पाडणाऱ्या वर तात्काळ कारवाई करण्यात यावी नसता आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.
प्रवासी निवारा पाडल्याने शालेय विद्यार्थ्यांसह प्रवाशांना भर पावसाळ्यात भिजावे लागत आहे. साबलखेड येथे न्यू धानोरा या नावाने रेल्वे स्टेशन असून येथे परत नवीन बस स्थानक बांधणे गरजेचे आहे. बस स्थानक पाडणाऱ्यावर राज्य परिवहन महामंडळाच्या मालमत्तेचे नुकसान करून वस्तूंची चोरी करणे, शासनाची रॉयल्टी न भरता अवैधरीत्या शेकडो ब्रास मुरूम टाकने इत्यादी प्रकरणी तात्काळ सदरील आरोपींचा शोध घेऊन गुन्हा दाखल करावा अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे. या प्रकरणी लोकप्रतिनिधी तसेच राज्य परिवहन विभागाणे लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT